# भगवान श्रीकृष्ण स्वतःला बांधून घेतात

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

अनेक युगांपूर्वी भारतात, भगवंताने श्रीकृष्ण रूपात आपल्या बाल्यावस्थेचा काळ गोकुळातील हिरव्यागार व समृद्ध शेतांमध्ये आणि बगिच्यांमध्ये व्यतीत केला. तो काळ त्या सर्व शेतकऱ्यांसाठी आणि गुराख्यांसाठी अतिशय आनंदाचा काळ होता, ज्यांना त्या समयी गोकुळात राहण्याचे सौभाग्य प्राप्त झाले होते. बाळरूपातील कृष्ण प्रत्येक दिवशी नवनवीन लीला करीत असे ज्या सर्वजण पाहत असत. या लीला त्या गुराख्यांसाठी अद्‌भुत व ज्ञान प्रदान करणाऱ्या होत्या.

अशाच एके दिवशी, कृष्णाची माता यशोदा त्यांच्या घराच्या बाहेरील अंगणात बसली होती आणि तिच्यासमोर मातीचा एक मोठा हंडा ठेवलेला होता. त्या हंड्यात साय भरलेली होती आणि त्याच्या मध्यभागी दोरीने बांधलेली लाकडाची एक मोठी रवी ठेवलेली होती. यशोदा दोरीला पुन्हापुन्हा दोन्ही बाजूंना ओढत होती ज्यामुळे रवी एकदा एका बाजूला आणि नंतर दुसऱ्या बाजूला गोल फिरत होती. यशोदा लोणी तयार करत होती.

ती दोरीला मागे-पुढे खेचत राहिली आणि जसजशी साय घट्ट होऊन त्याचे लोणी तयार होऊ लागले, तसतसा तिचा चेहरा घामाने चमकू लागला आणि तिचे केस कपाळावर चिटकू लागले. ती तिच्या कामात इतकी निमग्न झाली होती की, कृष्ण घरातून बाहेर येतो आहे हे तिच्या लक्षातच आले नाही.

“मैय्या?” त्याचा मधुर, मधाळ आवाज आला. त्यावेळी तो लहान बालकच होता.

“मैय्या?” यशोदेने चमकून वर पाहिले. कृष्ण तिच्यासमोर उभा होता, त्याच्या चेहऱ्यावर काजळ पसरले होते. असे वाटत होते की, तो जणू काही रडतो आहे.

काय झाले असे विचारण्याआधीच तो चिडक्या स्वरात म्हणाला, “मैय्या, मला खूप भूक लागली आहे! काहीतरी खायला दे ना.”

त्याच्या या अशा बोलण्याने यशोदेला हसू आले, तिचे खांदे सैलसर सोडत ती म्हणाली, “इतकेच ना?” तिने कृष्णाला आपल्या मांडीवर घेतले आणि लोण्याचा एक छोटासा गोळा त्याला दिला आणि पुन्हा घुसळायला सुरुवात केली.

तथापि, थोड्या वेळानंतर यशोदा परत थांबली. कृष्णाने डोळ्यांची उघडझाप करत तिच्याकडे पाहिले. तिच्या चेहऱ्यावर धास्ती दिसू लागली होती.

“दूध!” ती ओरडली. “मी ते चूलीवर ठेवले होते! कुठल्याही क्षणी ते उतू जाईल!”

तिने कृष्णाला घाईघाईने आपल्या मांडीवरून खाली उतरवले आणि घरात धाव घेतली. कृष्णाने तिला जाताना बघितले. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या, त्याचे ओठ खालच्या दिशेला वळले आणि रागाने थरथरू लागले. त्याच्या आईला जणू काही त्याच्यापेक्षा दूधाचीच चिंता जास्त होती.

त्याने लोण्याच्या हंड्याकडे पाहिले. अचानक त्याला एक कल्पना सुचली. तो हंड्याजवळ गेला, त्यातील रवी ओढून बाहेर काढली आणि मग — तडाऽऽऽऽऽक. एका झटक्यासरशी त्याने ती रवी हंड्यावर जोराने आपटली.

हंड्याचे तुकडे सर्वदूर उडाले. मऊ, पांढरे लोणी जमिनीवर चहूबाजूंना पसरले. लोणी वाया जाऊ नये म्हणून कृष्णाने जेवढे मावेल तेवढे लोणी जवळच पडलेल्या एका वाडग्यात भरले. त्याने तो वाडगा आपल्या छातीशी धरला, आपली बोटे चाटली आणि मग त्याला मिळालेल्या त्या बहुमोल ठेव्यासह चपळाईने तिथून बाहेर पळ काढला.

हंडा फुटल्याचा आवाज ऐकून काय झाले ते बघण्यासाठी यशोदा धावतच बाहेर आली. पण तोपर्यंत कृष्ण निघून गेला होता. तिने दिवसभर केलेल्या श्रमाचे अवशेष तिला चहूकडे पसरलेले दिसले, हंड्याचे तुकडे अंगणातील पायरीपर्यंत विखुरले होते आणि जमीन लोण्याने निसरडी झालेली होती.

यशोदेने आपले डोळे बंद केले आणि आपल्या कपाळावर हात मारून घेतला. तिला माहित होते की, तिचा कृष्ण खोडकर आहे, पण हे मात्र जरा अतीच झाले होते. का तो सतत अशा खोड्या करीत असतो? कितीदा तो लोणी चोरणार आहे? निराशेने निःश्वास सोडत, तिने आपल्या साडीचा पदर कमरेला खोचला आणि कृष्णाला शोधायला ती बाहेर पडली.

आता कृष्ण भगवंताचा अवतार होता, त्यामुळे त्याला हवा तितका वेळ तो स्वतःला लपवून ठेऊ शकत होता. स्वतःला इतरांसमोर प्रकट करणे हे त्याच्या स्वतःच्या इच्छेवर व त्याच्या करुणेवर निर्भर होते. म्हणून तो घराजवळच असलेल्या झाडावर आपल्या जागेवर बसून तिला निरखत होता.

यशोदा त्याच्या नावाने हाका मारीत चहूकडे धावत झाडाझुडूपांमध्ये त्याला शोधत होती, आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना आपल्या लोणी चोरणाऱ्या मुलाचा ठावठिकाणा विचारत होती.

काही काळ हे असेच चालू राहिले आणि मग यशोदा जरा चिंतातूर झाली, त्यामुळे कृष्णाला तिची दया आली. तिचे लक्ष वेधण्यासाठी त्याने झाडाची पाने हलवली.

यशोदेने लगेचच त्या आवाजाच्या दिशेने वर पाहिले. तिथे तो होता, तिचा मुलगा जो त्याच झाडावर बसलेल्या माकडांच्या दिशेने लोण्याचे गोळे फेकण्यात रमला होता. काही गोळे फेकल्यानंतर जरा वेळ थांबून थोडे-थोडे लोणी तो स्वतःदेखील खात होता.

“कृष्णा!” यशोदेने कठोर स्वरात त्याला हाक मारली. “पटकन झाडावरून खाली उतर. पुरे झाल्या आता तुझ्या खोड्या!”

कृष्णाने आपल्या मनमोहक स्मितहास्यासह तिच्याकडे पाहिले आणि एखाद्या आज्ञाधारक मुलाप्रमाणे तो झाडावरून खाली उतरू लागला. तो तिच्यासमोर जाऊन उभा राहिला, त्याचे डोळे विस्फारले होते आणि त्यांच्यात निरागसतेचा भाव भरून राहिला होता, त्याचा चेहरा आणि हात लोण्याने माखलेले होते.

“तू मला शोधत होतीस का, मैय्या?”

“हो का? मी तुला शोधत होते का?” ती अविश्वास दर्शवत म्हणाली. तिने आपले डोके हलविले आणि एक शब्दही न बोलता, कृष्णाला हाताने खेचत ती आपल्या घराच्या दिशेने चालू लागली.

“इथेच उभा राहा,” घरी पोहोचताच ती म्हणाली. “इथून अजिबात हलू नकोस. मी आलेच इतक्यात.” ती घरात गेली.

एका क्षणातच ती बाहेर आली, तिच्या हातावर एक लांब दोरी गुंडाळलेली होती.

“तुला मी आता या खांबाला बांधणार आहे,” घराला जोडूनच असलेल्या एका खांबाकडे निर्देश करून ती म्हणाली. “तुझे पळून जाणे बंद. लोण्याची मडकी फोडणेही बंद.”

कृष्णाने आपल्या त्याच मोहक स्मित हास्यासह यशोदेकडे पाहिले. त्याचे हावभाव इतके अलौकिक होते की, यशोदा मागे वळून त्याच्याकडे पाहण्यास विवश झाली. खरे पाहता, जेव्हापासून तिला झाडावर बसलेला कृष्ण सापडला होता, तेव्हापासूनच तिचे हृदय भरून आले होते व भावूकही झाले होते. परंतू त्यावेळी ही शिक्षा करणे आवश्यक होते. अशा खोड्या पुढे चालू राहायला नको होत्या. त्याला दोरीने  बांधण्यासाठी पुढे जाण्याआधी एक क्षणभर थांबत तिने आपले मन घट्ट केले.

तिने दोरीचे एक टोक पकडले आणि उरलेल्या दोरासाठी आपल्या हाताला खांबाभोवती दुसऱ्या बाजूला नेले. परंतू जेव्हा तिने कृष्णाच्या पोटावर ती दोरी ओढायचा प्रयत्न केला, तेव्हा एक अद्भुत घटना घडली. दोरीची लांबी कमी पडली!

यशोदेला काही कळतच नव्हते. दोरी बऱ्यापैकी मोठी आहे याची तिला खात्री होती. खरेतर, तिला वाटले होते की आवश्यकतेपेक्षा दोरी *अधिकच* मोठी आहे! तिने ती दोरी जोराने ओढण्याचा प्रयत्न केला, पण काहीही उपयोग झाला नाही. ती दोरी भगवंताला बांधू शकली नाही.

आपण ठरवलेली गोष्ट तडीस नेण्यासाठी माता यशोदा आणखी थोडी दोरी आणायला आत गेली. तिने ही नवीन दोरी आधीच्या दोरीला जोडली. दोन्ही दोऱ्यांची एकत्रित लांबी चांगली अंगणभर लांब झाली. यशोदा समाधानाने आपल्या मुलाकडे वळली आणि तिने चहूबाजूंनी त्याला दोरीने गुंडाळले.

तरीदेखील, काहीही कारण नसताना आणि कोणत्याही तर्कसंगत स्पष्टीकरणाशिवाय पुन्हा तसेच घडले. दोरी तेव्हाही कमी पडली.

*“काय हे?”* यशोदा चकित झाली. ती निराश झाली होती आणि काय करावे हेही तिला कळत नव्हते, तरीही दोरी खेचण्याचा प्रयत्न तिने चालूच ठेवला. तिने लांबच लांब दोऱ्यांचे तुकडे घेऊन या आशेने आधीच्या दोरीला ते बांधले की, ज्यामुळे कृष्णाला बांधता येईल इतकी लांब दोरी तिला मिळू शकेल. असे करण्यात अनेक तास निघून गेले. यशोदेचे हात थकून शिथील पडू लागले. तिला श्वास घ्यायलाही त्रास होऊ लागला. तिने कितीही प्रयत्न केला तरी दोरीची लांबी दोन बोटे कमीच पडत होती.

शेवटी, यशोदेने आपल्या हातातली दोरी सोडून दिली. तिने आपल्या मुलाकडे अशा नजरेने पाहिले की, जणू ती प्रथमच त्याला पाहात आहे. त्याचे तोंड हलकेसे उघडे होते, त्याच्या भुवयांमध्ये एक लहान रेषा आकाराला येत होती. कृष्ण, जो पूर्ण वेळ शांत होता, अतिशय साधेपणाने तो तिच्याकडे पाहू लागला. त्याचे डोळे चमकत होते.

यशोदा जेव्हा निरंतर त्याच्याकडे पाहत राहिली — तिची भीती आश्चर्यात रूपांतरीत झाली आणि आश्चर्याचे रूपांतर आदरभावात झाले. स्वतःच्या अंतःकरणात तिला एक रूपांतरण जाणवले. प्रेमभाव, आपल्या मोठाल्या लाटांसह तिच्या हृदयातून प्रवाहित होऊ लागला. आदराने आणि भक्तीने तिच्या अस्तित्वाला न्हाऊ घातले. तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या.

कृष्णाने स्मितहास्य केले. “मैय्या,” तो म्हणाला, “तुला पुन्हा प्रयत्न करून पाहायचा आहे का?”

आणि त्याबरोबरच भगवंताने दोरीची शेवटची दोन्ही टोके पकडून यशोदेच्या हाती दिली.

©२०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®। सर्वाधिकार सुरक्षित।

ही कथा श्रीमद्भागवतम् अथवा भागवत् पुराणात वर्णन केलेल्या भगवान कृष्णाच्या प्राचीन कथांपैकी एका कथेने प्रेरित आहे. या कथेला नेहमी दामोदर-लीला म्हटले जाते. दामोदर हे भगवान श्रीकृष्णाचे एक नाव आहे; ज्याचा अर्थ आहे, “तो, ज्याच्या पोटाभोवती दोरी बांधली आहे.” श्रीविष्णूसहस्त्रनामाच्या पाठामध्ये गायल्या जाणाऱ्या नामांमध्ये हेदेखील एक नाव आहे.